# प्रकरण ५ वे

## उपसंहार

# प्रकरण ५ वे

## : उपसंहार :

### उध्दवराव पाटील : विविध अंगी राजकीय नेतृत्व

अभ्यासाचा उद्देश : उध्दवराव पाटील विविध अंगी राजकीय नेतृत्व हा शोध निबंधासाठी विषय निवडत असताना त्यांच्या राजकीय नेतृत्वासंबंधी सर्वांगिण अभ्यास व्हावा हा एक प्रमुख हेतू डोळ्यासमोर होता. स्वातंत्र्यपूर्वकाळात व स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या राजकीय जनआंदोलनात उध्दवराव पाटलांनी सक्रीय सहभाग घेवून चळवळी यशस्वी करण्याचा व त्यांना एकनिश्चित दिशा देण्याचा प्रयत्न केलेला होता त्याचाही विचार या शोध निबंधात करण्यांत आलेला आहे. उध्दवराव पाटील यांच्या राजकीय नेतृत्वाचे विविध पैलुचा अभ्यास करीत असताना त्या काळातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, व राजकीय परिस्थितीचा अभ्यास होतो. त्यातूनच त्या भागातील राजकीय विकासाच्या प्रक्रियेची जाणीव स्पष्ट होत असते. म्हणूनच उध्दवरावांच्या राजकीय नेतृत्वाचे विविध पैलूचा या शोध निबंधात सखोलपणे अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या शोध निबंधाचा अभ्यास करीत असताना पुढील उद्देश डोळ्यासमोर निश्चित करण्यांत आले होते.

(१) उध्दवराव पाटलाच्या राजकीय नेतृत्वाचा विकास होत असतानाची सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती कशी होती.

(२) उध्दवरावांच्या विचाराची जडणघडण

(३) उध्दवराव पाटील ज्या समाजातून पुढे आले त्या समाजाची एकूण परिस्थिती, त्या समाजाच्या अडीअडचणी.

(४) त्या काळात चालविल्या जात असलेल्या राजकीय व सामाजिक चळवळीतील उध्दवरावांचे योगदान.

(५) उध्दवरावाच्या नेतृत्वाची वैशिष्टये

(६) उध्दवराव पाटलांचे त्यांच्या पक्षाला लाभलेले योगदान.

(७) उध्दवरावांच्या राजकीय नेतृत्वाचे मूल्यमापन.

वरील व्यापक उद्देश डोळ्यासमोर ठेवून हा शोध निबंध पूर्ण करण्यासाठी ऐतिहासिक पध्दतीचा संशोधनासाठी अवलंब केलेला आहे. या पध्दतीत ऐतिहासिक कागदपत्रे, वृत्तपत्रे, मासिके, शासकीय व निमशासकीय नियतकालीके, ग्रंथालये, पुस्तके, अप्रकाशित व प्रकाशीत शोधनिबंध , पत्रके, प्रत्यक्ष मुलाखती, ध्वनीमुद्रांकित भाषणे, विधानसभेतील कामकाज इतिवृत्त या साधनाचा उपयोग केलेला आहे. उध्दवरावानी स्वत: कांही लेख लिहिले त्याचाही या कामात खूप उपयोग झाला आहे.

## सा रां श :

शोध निबंधाच्या पहिल्याच प्रकरणात उध्दवरावांचे नेतृत्व ज्या भागातून पुढे आले त्या भागातील सामाजिक व राजकीय पार्श्वभूती दिलेली आहे. उस्मानाबाद जिल्हा हा निजामाच्या राजवटी-खाली असल्यामुळे संख्येने जास्त असलेल्या बहुजन समाजावर निजामाने अन्वनित अत्याचार केलेले होते. सरंजामदारी व जमीनदारी मोठया प्रमाणावर असल्यामुळे सर्वसामान्य लोकांचे फार हाल होत होते. लहान शेतकरी व शेतमजूर अत्यंत पिडला जात होता. विशिष्ट जमातीची राजवट असल्यामुळे संख्येने जास्त असलेल्या हिंदुची स्थिती अतिशय शोचनीय

झालेली होती. सर्वसामान्य माणूस आर्थिक परिस्थितीने गांजलेला होता. ब्रिटीशांना घालविण्यासाठी काँग्रेसने सुरु केलेल्या चळवळीचाही प्रभाव पडत होता. त्यामुळे हैद्राबाद संस्थानात स्टेट काँग्रेसच्या चळवळीने जोर धारला. गांधीचे नेतृत्व उदारमतवादी असल्याने बहुजन समाजातील तरुण काँग्रेसकडे सुरुवातीला आकर्षिला गेला. तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीचा त्यांच्यावर प्रभाव पडलेला दिसतो. तत्कालीन परिस्थिती हीच त्यांच्या नेतृत्वाच्या उदयाला कारणीभूत ठरलेली दिसते.

पाटील ज्या समाजातून पुढे आले त्या समाजाची सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती ही त्यांचे राजकीय विचार पक्के करण्यास कारणीभूत ठरलेली दिसून येते. विशेषत: त्या काळात महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळीचा प्रभाव त्यांच्यावर फार मोठया प्रमाणात होता. सत्यशोधक चळवळीतूनच पुढे ते मार्क्सवादाकडे आकर्षित झालेले दिसून येतात. त्या काळात चालू असलेली सावकारशाही मोडून काढण्यास त्यांना तत्कालीन परिस्थितीनेच साथ दिलेली दिसते. अर्थात कोणत्याही नेतृत्वावर तत्कालीन सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा प्रभाव पडलेला असतो. एका सामान्य शेतक-याच्या कुटुंबात जन्म झाल्यामुळे सामान्य शेतक-याची व शेतमजूराची काय दु:खे असतात याची जाण प्रथमत:च झाली व पुढे सर्व आयुष्य त्यांच्या चळवळी उभ्या करण्यात घालविण्यात आलेले दिसून येते.

दुस-या प्रकरणात त्यांच्या विचारसरणीचा व व्यक्तीमत्वाचा विचार केलेला आहे. उस्मानाबाद जिल्हयातील सावकार विरोधी चळवळीपासून राजकीय कार्यक्षेत्राला सुरुवात झालेली दिसून येते. निजाम सरकारने चालविलेल्या जुलूमाला विरोध करण्यासाठी स्टेट अंतर्गत कार्य करीत लढा पुकारला. जबाबदार राज्यपध्दतीचा आग्रह धारण्यात आला.

बहुजन समाजाच्या विकासाच्या चळवळीचा त्यांच्यावर झालेला परिणाम याचाही अभ्यास केलेला आहे. उध्दवराव पाटलावर मार्क्सवादाचा पडलेला प्रभाव याचाही या प्रकरणात ऊहापोह केलेला आहे. त्यांच्या जीवनाची एकूण राजकीय वाटचाल ᳲ कशी झाली याचाही विचार प्रामुख्याने यात केलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणात त्यानी स्विकारलेली राजकीय प्रणाली याचा सविस्तर विचार केलेला आहे. उध्दवराव पाटलांचे राजकीय नेतृत्व विकसीत होत असताना ज्या टप्प्यातून गेले त्याचा विचार यात केलेला आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या वाटचालीमध्ये त्यांचे असलेले योगदान या संदर्भात चर्चा केलेली आहे. शेतकरी कामगार पक्ष त्यांच्यामुळे मराठवाड्यात प्रबळ व प्रभावी ठरला. ज्या समाजातून ते आले त्या समाजाच्या प्रश्नाची त्यांनी केलेली मिमांसा याचाही ऊहापोह केलेला आहे. ज्या अधिष्ठानावर राजकीय पक्ष आधारलेला आहे त्याचीही चर्चा या प्रकरणात केलेली आहे.

चौथ्या प्रकरणात उध्दवरावानी चालविलेल्या विविध राजकीय व सामाजिक चळवळीचा विचार केलेला आहे. त्यांचा चळवळीवर फार विश्वास असल्यामुळे त्यांनी केलेल्या विविध राजकीय चळवळीचा अभ्यास या प्रकरणात स्वतंत्रपणे केलेला आहे. विशेषत: स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महाराष्ट्रात भाषिक प्रांत रचनेसाठी जी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ करावी लागली ती राबविण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. संयुक्त महाराष्ट्र हा समाजवादासाठी आवश्यक आहे. संयुक्त महाराष्ट्रातच मराठी भाषिकाचे भवितव्य आहे असा जाण असणारा पुढारीचे कार्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. शेतकरी व शेतमजूरासाठी त्यांनी चालविलेल्या विविध चळवळीचा ऊहापोह या प्रकरणात केलेला आहे. अर्थात या चळवळी त्यांनी विधानसभेत व विधान-

सभेच्या बाहेर अशा दोन्ही क्षेत्रावर केलया आहेत. सहकार चळवळीबद्दल त्यांची असलेली मते व भू-दान चळवळीबद्दलचे त्यांचे विचार याचाही ऊहापोह या प्रकरणात केलेला आहे.

## उध्दवरावांचे राजकीय नेतृत्व :

निजाम राजवटीच्या काळातून उध्दवरावांचे राजकीय नेतृत्व विकसीत झाले, पुढे त्याला सत्यशोधक समाजाच्या विचारांची जोड मिळाली. शेवटी कार्लमार्क्सच्या विचाराने त्यांचे राजकीय विचार पक्के केले. निजामाचे राजवटीत संख्येने जास्त असलेल्या हिंदुवर अन्याय, अत्याचार केले जात याला वाचा फोडण्यासाठी स्टेट कॉंग्रेस अंतर्गत कार्याला सुरुवात केली. निजामाने भारतीय संघराज्यात सामील होण्यास नकार दिल्याबरोबर इतर लोकांच्या बरोबर सशस्त्र लढयास सुरुवात केली. येथूनच खऱ्या अर्थाने त्यांच्या राजकीय नेतृत्वाचे गुण दिसू लागले. हैद्राबादला मुक्ती संग्राम यशस्वी करण्यामध्ये इतर पक्षाबरोबर त्यांच्याही पक्षाने योग्यप्रकारची भूमिका बजावली. शेतकरी कामगार पक्षाचे राज्य स्थापन होत नाही किंवा बहुजन समाजासाठी सत्ता वापरली जात नाही हे लक्षात येताच स्टेट कॉंग्रेसमधून बाहेर पडून शेतकरी कामगार पक्षात दाखल झाले. शेवटपर्यन्त त्याच पक्षात टिकून राहिले. शेतकरी कामगार पक्ष मराठवाडयात वाढविण्यात व रूजविण्यात सिंहाचा वाटा होता. विद्यार्थीदशेपासूनच राजकीय चळवळीला सुरुवात. एल.एल.बी. झाले असतानाही वकीलीवर लाथ मारून राजकारणात उडी शेवटपर्यन्त वकीली केलीच नाही. आयुष्याच्या अखेरपर्यन्त राजकीय चळवळीत सहभाग हे त्यांचे वैशिष्टय होय.

अनेक सहकारी मित्र सत्तेच्या व स्वार्थाच्या मागे लागून सत्ताधारी पक्षात जात असताना स्थितप्रज्ञासारखे उभे राहून तरुणांना

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आदर्श घालून दिला. शेतकरी कामगार पक्षात सुरुवातीपासून ते अखेरपर्यन्त पाय रोवून उभे, अनेक संधी चालून आल्या असतानाही तत्वाला बाधा येवू दिली नाही. शेतकरी कामगार पक्षाची मराठवाड्यातील धुरा वाहिली. अनेक राजकीय व सामाजिक चळवळीतून समाजाचे प्रबोधन करण्याचे प्रयत्न त्यांनी केले. त्यांचे राजकीय नेतृत्व म्हणजे भावी पिढीला दिपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरणारे होते. बहुजन समाजाच्या कल्याणासाठीच अखेरपर्यन्त लढत राहिले. सीमा भागातील जनतेला दिलासा देणारे नेतृत्व होते. त्यांच्या सुखदु:खात सामील होवून तो प्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्न केला. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ नेटाने पुढे चालू ठेवण्यात महत्वाची भूमिका विरोधी पक्ष नेते म्हणून सभागृहात उत्तम कामगिरी बजावली. सरकारला आपल्या प्रभावी वक्तृत्वामुळे प्रभावित केले. राजकीय विचार स्पष्ट व छातीठोकपणे मांडणारा नेता म्हणून मान्यता. शेतकरी व शेतमजूरांचे प्रश्न विधानसभेत व विधानसभेबाहेर सातत्याने मांडण्याचा प्रयत्न केला. शेती व शेती प्रश्नाबाबत सखोल ज्ञान असणारा विचारवंत. अगदी संशोधनात्मक दृष्टीकोनातून त्यानी भारतीय शेतीची चिकित्सा केली होती. दुर्दैवाने त्यांच्या विचाराला चालना मिळाली नाही. महाराष्ट्राची विधानसभा आपल्या विचाराने प्रभावीपणे गाजवून सोडली. कांही लोक फक्त वक्तेच असतात तर कांही फक्त कृतीशिल असतात. त्यांच्यात मात्र दोन्हीचाही मिलाफ झालेला दिसून येतो. दलीताना सामाजिक न्याय, प्रतिष्ठा मिळवून देण्यामध्ये मोलाची कामगिरी केली. दलीताना सामाजिक प्रतिष्ठा लाभावी म्हणून पोलीस पाटील पदे दलीताना देण्याबाबत आग्रह धरला. विविध राजकीय व सहकारी चळवळीमध्ये दलीतांचा सहभाग करण्यामध्ये महत्वाची भूमिका त्यांनी बजावली.

वैचारिक भूमिका :

उध्दवरावांची वैचारिक जडणघडण वेगळ्या पध्दतीने घडलेली

आहे. कुठलीही पार्श्वभूमी नसलेला हा नेता आहे. नरसिंगरावाच्या सहवासामुळे सावकार विरोधी भूमिका स्विकारली. हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या निमित्ताने जी. डी. लाडाशी संपर्क, येथूनच डावे विचारास मजबुती आली. बहुजन समाजातून आलेल्या केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव, नाना पाटील आदी प्रभृतींच्या विचाराचा प्रभाव पडलेला. फुलेंच्या सत्यशोधक चळवळीमुळे त्यांची वैचारिक बैठक पक्कमी झाली. शेतकरी कामगार पक्षात असल्यामुळे मार्क्सवादाचा फार मोठा प्रभाव त्यांच्यावर होता. सर्वसामान्य माणसाला समजेल अशा साध्या सोप्या भाषेत मार्क्सवादाचे दर्शन ते सर्वसामान्याना घडवीत असत.

मार्क्सवादाचा व सत्यशोधक चळवळीचा प्रभाव असल्यामुळे शेतकरी व शेतमजूर यांच्याच हिताची जोपासणा करणारे विचार सतत मांडले. शेतकरी व कामगाराचे राज्य निर्माण व्हावे यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. मार्क्सवादाचा व फुलेंचा प्रभाव असल्यामुळे सतत श्रमीकांचे व शोषितांचे लढे उभारले. चळवळीवर फार मोठी श्रध्दा, चळवळीने सर्व कांही मिळू शकते यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. अर्थात चळवळ मात्र सतत करीत राहिले पाहिजे. भारतीय परिस्थितीत मार्क्सवाद रूजविण्याचा प्रयत्न केला. वैचारिक भूमी संघर्षाची नसून सहकार्याची होती. आपले विचार प्रभावीपणे मांडून सत्ताधारी पक्षाला आपल्याकडे आकर्षित करून घेण्याची प्रवृत्ती.

उध्दवराव पाटलाची वैचारिक बैठक सत्यशोधक, मार्क्सवाद अशा स्वरूपाची होती. भारतीय समाज व्यवस्थेचे स्वरूप समजावून घेवूनच आपले विचाराची दिशा त्यांनी स्पष्ट केली होती. सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील विषमता व शोषण नष्ट करूनच नवा समाज उभा करण्याचे त्यांचे स्वप्न होते. मार्क्सवाद हा भारतीय

परिस्थितीचा विचार करूनच भारतात लागू करता येईल [redacted] जशाचा तसा स्विकारता येणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते.

नेतृत्वाची वैशिष्टये :

कुठल्याही प्रकारची पार्श्वभूमी नसलेला एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा स्वकतृत्वाने मोठेपणाला जातो. सर्वसामान्य कुटुंबात जन्म झाल्याने सर्वसामान्यांची दु:खे चटकन जाणणारा व त्यांचे आश्रु पुसणारा.

कार्यकर्त्याशी ते मनमोकळे आणि दिलखुलास चर्चा करतात त्यामुळे कार्यकर्त्यांना ते आपलेच वाटतात. नेता आणि कार्यकर्ता अशी भिंत त्यांच्यात आणि कार्यकर्त्यात असत नाही. म्हणून कार्यकर्त्यांना त्यांच्याशी वागताना, बोलताना दुजाभाव अथवा दुराभाव वाटत नाही.

सर्व सहकारी मित्र पदाच्या, पैशाच्या, सत्तेच्या मोहाने पक्ष सोडून जात असताना सतीच वाण घेवून त्यांनी वैचारिक बांधीलकी सोडली नाही. यशवंतराव चव्हाणानी अनेकवेळा आमिष दाखविण्याचा प्रयत्न केला. परंतु ते आपल्या तत्वापासून ढळले नाहीत उलट भावी पिढीपुढे आदर्श निर्माण केला.

उध्दवरावांची वैचारिक निष्ठा निर्विवाद आहे. कसलाही अवघड प्रश्न अत्यंत सोप्या भाषेत ते उकलून सांगतात. त्यांचे विचार ऐकताना कार्यकर्त्यांच्या मनात कार्यकर्त्यांना ते जवळचे वाटतात. कारण ते कार्यकर्त्यांना जिव्हाळयाने वागवतात. त्यांच्यात नी आपल्यात ते अंतर वाढू देत नाहीत. कार्यकर्त्यांच्या चूका मायेच्या भावनेने ते दूर करतात. कार्यकर्त्यांना सांभाळण्याचा, त्यांना कामाला लावण्याचा, त्यांच्यातील विचार [redacted] प्रगल्भ करण्याचा त्यांचे तंत्र इतरापेक्षा वेगळे आहे.

म्हणून ते कायमचे कार्यकर्त्यांचे होवून बसतात. त्यांचे व्यक्तीमत्व आजातशत्रु आहे. त्यांच्या पक्षात आणि इतर पक्षातील कार्यकर्त्यांना त्यांच्याबद्दल आदरच वाटतो.

वैचारिक बांधीलकी, शुध्दचारित्र्य, लढावू बाणा ही त्यांच्या स्वभावाची खास वैशिष्टये म्हणता येतील. शेतक-यांचे संघटन करण्याची क्षमता असणारा नेता म्हणून ख्याती. त्यांचे भाषण म्हटले की हजारो कार्यकर्ते बैलगाडया जूपून भाषणास येत असत. वैचारिक व संघटनात्मक पातळीवर त्यांचे कार्यक्षेत्र आहे. कांही लोकांचे नेमके याउलट असते. वैचारिक पातळीवर त्यांचे कार्य असले तरी संघटनात्मक पातळीवर नसते. परंतु उध्दवराव याला अपवाद आहेत. शेतकरी व शेतमजूर यांच्या प्रश्नाविषयी शास्त्रीय जाण असणारा नेता, शेतक-यांचे प्रश्न सर्व बाजूने विचार करून मांडणारा नेता. मार्क्सवादाला भारतीय परिस्थितीत रूजविण्याचा प्रयत्न करणारा कार्यकर्ता. इत्यादी त्यांच्या स्वभावाची वैशिष्टये सांगता येतील.

<u>मूल्यमापन</u> :

उध्दवरावाच्या राजकीय नेतृत्वाचे मूल्यमापन करीत असताना ते ब-याचवेळा पक्षाच्या पातळीवर जाते. शेतकरी कामगार पक्ष मुळात जो स्थापन झाला तो काँग्रेस अंतर्गत शेतकरी संघ स्थापन करण्यास बंदी केल्यामुळे. बरेचसे पुढारी काँग्रेसवर निष्ठा ठेवणारे शेतकरी कामगार पक्षात होते. त्यामुळे सुरुवातीच्या काळात म्हणजे १९४८ ते १९५४ मध्ये पक्षात मोठी गोंधळ राहत नाही. गुंतागुंतीचा प्रश्न असला तरी ते इतक्या सहजपणे समजून सांगतात की त्या विषयाचे कार्यकर्त्यांना सहजपणे आकलन होवून जाते. शिबीरात बोलताना असो अथवा त्यांची

सभा असो त्यात ते एकरूप होवून जातात. त्यामुळे त्यांचे भाषण ज्वलंत आणि जिवंत होते. कार्यकर्त्यांना त्यांच्या विचारातून कार्याची आणि विचाराची दिशा मिळते. त्यांची वैचारिक निष्ठा जशी भक्कम आहे तशीच त्यांच्यातील वैचारिक स्पष्टता अगदी स्वच्छ आहे. शेतकऱ्याला त्यांच्याच भाषेत अवघड विचार समजावून सांगण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे.

त्यांनी अनेक चळवळीत सक्रीय सहभाग घेतला. जनतेच्या प्रश्नावर ते कायम आघाडीवर राहिलेले नेते आहेत. त्यांचे मोठेपण त्यांनी जे राजकारण केले ते ध्येयवादाने भारावून केले यात आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनाच नव्हे तर इतर पक्षातील कार्यकर्त्यांनाही त्यांचा हा ध्येयवाद आदर्श वाटावा इतका उत्तुंग आहे.

साधी राहणीमान हे त्यांचे आगळे वेगळे वैशिष्टय आहे. नेतेपणाचा दिमाख दाखविणे हे त्यांच्या व्यक्तीमत्वात मुळीच नाही. साध्या शेतकऱ्याच्या पोशाखात राहणारा, वावरणारा हा नेता खऱ्याखुऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा नेता आहे. नेतृत्वासाठी लागणारी नैतीकता आणि समाज हिताची कणखर दृष्टी हे त्यांचे खास विशेष होत. समाजाच्या चौफेर प्रश्नांचा अभ्यास, व्यासंग, ताठर जीवननिष्ठा इत्यादी गुणांनी त्यांचे व्यक्तीमत्व महाराष्ट्राच्या जनतेच्या प्रश्नावर लढणारे एक लढावू नेतृत्व आहे. जनतेच्या प्रश्नावर व्यावहारिक तडजोडी त्यांनी कधीच केल्या नाहीत. फूट पडली, नेतृत्वाबाबत मारामाऱ्या झाल्या, शंकरराव मोरे, केशवराव जेधे, रघुनाथराव खाडीलकर, तुळशीदास जाधव, यशवंतराव मोहिते यासारखे बेभरवशाचे पुढारी शेतकरी कामगार पक्षाला लाभले होते त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाची पाळेमुळे महाराष्ट्रात खोलवर रूजली गेली नाहीत.

शेतकरी कामगार पक्षाने धड मार्क्सवाद नीट स्विकारला नाही किंवा त्यांना ठामपणे भांडवलवादाला विरोध करता आला नाही. त्यामध्ये मार्क्सवादाबाबत वैचारिक गोंधळ झालेला दिसून येतो. त्यामुळे उध्दवराव सारख्या अचूक बुध्दीमत्ता असणाऱ्या नेत्याचा देशालाही व पर्यायाने महाराष्ट्रालाही फायदा करून घेता आला नाही.

उध्दवरावांच्या जवळ पक्षाचे नेतृत्व करण्याचे गुण होते परंतु त्यांनी नेहमीच सत्तेपासून दूर राहण्याची वृत्ती जोपासली की जी पक्षाच्या हिताच्यादृष्टीने घातक ठरली. पक्षाचे नेतृत्व करण्याची क्षमता असूनदेखिल किंवा तशी संधी चालून आली असता देखील केवळ त्यांचा सौजन्यशील स्वभाव नडला. त्यांच्या या वृत्तीमुळे पक्षाच्या पडझडीस आणखी संधी मिळाली. वेळीच त्यांनी नेतृत्व स्विकारले असते अथवा केले असते तरी ते महाराष्ट्रात पक्षाला उज्वल भवितव्य उपलब्ध करून देवू शकले असते. परंतु त्यांनी तसे केले नाही ही त्यांची फार मोठी चूक झाली व पक्षाची कधीही न भरून येणारी हानी झाली नसती.

शेतकरी कामगार पक्षाने चालविलेल्या चळवळीत सातत्य नव्हते. पक्ष जीवंत ठेवावयाचा असेल अथवा वाढवावयाचा असेल तर पक्षातर्फे सतत कांहीना कांही कार्यक्रम चालविले गेले पाहिजेत, सारख्या चळवळी सुरु ठेवल्या पाहिजेत. दुर्दैवाने पक्षातर्फे जेंव्हा गरज होती त्यावेळी चळवळी सुरु केल्या गेल्या नाहीत त्यामुळे चळवळीत सातत्य राहिले नाही हे एक पक्ष कमकुवत होण्यास कारण ठरले.

पक्षाचे काम नेटाने किंवा जोराने चालविण्यासाठी पक्षाचे फालोअर्स असणे आवश्यक असते. तसे ते संख्येने जास्त निर्माण करण्याची गरज असते. परंतु शेतकरी कामगार पक्षाने कधीही जाणीवपूर्वक असा प्रयत्न केला नाही. पक्षाला फालोअर्स जर निर्माण करता आले असते तर या पक्षाला

महाराष्ट्रात उज्वल भवितव्य लाभले असते. महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षाला पर्याय देणारा एकमेव पक्ष असतानासुध्दा पक्षातील नेत्यांच्या उदासीन भूमिकेमुळे पक्षाचा विस्तार म्हणावा तितका वाढलेला दिसत नाही. कोणत्याही राजकीय पक्षाला यशस्वी होण्यासाठी सर्व गटांचा पाठींबा असणे आवश्यक असते. दलीत आदिवासी यांचे फारसे पाठबळ या पक्षाला लाभलेले नव्हते.

पक्षामध्ये संघटनेत विस्कळीतपणा आला आहे. पक्षाचे कार्य व्यवस्थित होण्यासाठी पक्ष संघटना मजबूत असावी लागते. शेतकरी कामगार पक्षातील कोणत्याही नेत्यानी या समस्येचा गंभीरपणाने विचार केलेला दिसत नाही. उध्दवराव पाटलानी देखील पक्षातील संघटनेचा विचार केलेला नव्हता. संघटनेत विस्कळीतपणा हे देखील या पक्षाला कमकुवत करण्यास कारणीभूत ठरले.

सुरूवातीला पक्षातर्फे अभ्यासवर्ग चालविले जात होते, नंतरच्या काळात त्यात पिछेहाट झाली. या पक्षाला निवडणूकीतही प्रमाणापेक्षा फारच कमी यश मिळत गेले. हे या पक्षाला शिथीलता येण्यास कारणीभूत ठरले. आता नव्याने पुन्हा पक्ष उभा राहू इच्छित आहे, तसे त्यांचे प्रयत्नही चालले आहेत. पक्षाने जर योग्यप्रकारे भूमिका बजावली असती तर महाराष्ट्रात तो कॉंग्रेसला निश्चित पर्याय ठरू शकला असता. परंतु कोणत्याही नेत्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले नाहीत असे माझे स्पष्ट मत आहे.

# संदर्भ ग्रंथाची सूची

## (अ) प्राथमिक साधाने

(१) शेतकरी कामगार पक्षाने प्रसिध्द केलेली प्रकाशने, पुस्तिका, पत्राके, परिपत्राके, मुखपत्रे, अधिवेशनातील ठराव इत्यादी.

(२) शासकीय कागदपत्रे मुख्यत्वेकरुन उध्दवराव पाटील यांची विधानसभेतील भाषणे.

(३) उध्दवराव पाटील यांची प्रा. बा. ह. कल्याणकरांनी ध्वनीमुद्रीत केलेली मुलाखात.

(४) उध्दवरावांच्या सत्कार प्रसंगी अनेक राजकीय नेत्यानी केलेली भाषणे.

(५) शेतकरी कामगार पक्षातील ज्यांनी उध्दवराव पाटील यांचेबरोबर काम केले अशांच्या प्रत्यक्ष घेतलेल्या मुलाखाती.

(६) निवडणूक आयुक्तांचे प्रसिध्द झालेले निवडणूक अहवाल.

(७) जनगणाना अहवाल.

## (ब) दुय्यम साधाने

(१) अत्रे प्र. के. " क-हेचे पाणी " खंड तीन ते पाच परचूरे प्रकाशन मुंबई डिसेंबर १९६५

(२) बिंदू दिगंबरराव " हैद्राबाद राज्याचे विसर्जन " साकेत प्रकाशन मुंबई १९७६

(३) भालेराव अनंत - " हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा " भारत मुद्रक लिमिटेड औरंगाबाद सप्टेंबर १९८७

(४) भालेराव अनंत " पेटलेले दिवस " श्री विद्या पुणे १९८५

(५) बागल माधवराव " जीवन ~~म~~ संग्राम " महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, १९७०

(६) बागल माधवराव - " सामाजिक विचार मंथन " आनंद प्रकाशन औरंगाबाद १९८१

(७) बागल माधवराव - " संयुक्त आघाडी व्हायला पाहिजे " राष्ट्रवीर बेळगांव ७ मार्च १९५२

(८) भणगे भा. श. (संपादक) साहित्य विचार आणि समाज चिंतन

(९) बेडेकर डी. के. " संयुक्त महाराष्ट्र " चित्रशाळा प्रकाशन पुणे

(१०) बावीस्कर बी. एस. " द पोलिटीक्स ऑफ डेव्हलपमेंट " न्यु दिल्ली ऑक्सफर्ड प्रेस १९८०

(११) बिराजदार पी. आर. " पोलीटिकल फीलॉसोफी ऑफ द पिझंटस् अँड वर्करस् पार्टी अे क्रिटीकल स्टडी वुईथ स्पेशल रेफरन्स टू दाभाडी थेसीस (अप्रकाशित प्रबंध ) शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर.

(१२) बागल माधवराव " जीवन प्रवाह " भाग १ व २ श्री सिध्देश्वर प्रिंटींग प्रेस कोल्हापूर १९५४

(१३) भोळे भास्कर " यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य " साकेत प्रकाशन औरंगाबाद १९८५

(१४) भोळे भास्कर ल. - शेतकरी कामगार पक्ष (१९४८ ते १९६७) अप्रकाशित प्रबंध - नागपूर विद्यापिठ, नागपूर.

(१५) चव्हाण यशवंतराव " कृष्णाकाठ" खंड १ प्रेस्टीज पब्लीकेशन पुणे १९८४

(१६) चव्हाण यशवंतराव " सह्याद्रीचे वारे " संचालक, प्रसिध्दी विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९६२

(१७) देसाई दाजिबा " शेतकरी कामगार पक्ष - दाभाडी राजकीय प्रबंध " माधव प्रिंटींग प्रेस अलिबाग १९६९

(१८) देसाई बाबासाहेब " भारतीय शेतकरी कामगार पक्ष राजकारण" व्यंकटेश प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर १८-१-१९८३.

(१९) देसाई अ. आर. " भारतातील शेतकरी चळवळ " ऑक्सफर्ड युनि. प्रेस मुंबई १९७९

(२०) डागे श्री. अ. " बारा भाषणे " अभिनव प्रकाशन मुंबई १९७५

(२१) दाते सुनिल " पोलिटीकल डेव्हलपमेंट इन मराठवाडा " (अप्रकाशित प्रबंध ) पुणे विद्यापिठ १९७८

(२२) देशपांडे गंगाधर " माझी जीवन कथा " मौज प्रकाशन पुणे १९६०

(२३) देवगीरीकर टी. आर. " राजकीय आठवणी " चित्रशाळा प्रेस पुणे १९७५

(२४) देव शंकरराव " देव देते पण कर्म नेते " पुणे सासवड आश्रम विश्वस्त मंडळ १९७६

(२५) गाडगीळ न. वि. " पथीक " भाग १ व २ व्हीनस प्रकाशन पुणे १९६५

(२६) गडकरी माधवराव "असा हा महाराष्ट्र " मुंबई १९६५

(२७) गडकरी माधवराव - " संयुक्त महाराष्ट्राचे महारथी " मुंबई १९८५

(२८) घोष शंकर " पोलिटीकल आयडियाज अँड मुव्हमेंट इन इंडिया " अलाईड पब्लीकेशन कलकत्ता १९५५

(२९) गेल ऑमनेट – कल्चरल रिव्होल्ट इन अे कोलोनिअल सोसायटी अे स्टडी ऑफ नॉन ब्राम्हीण मुव्हमेंट इन वेस्टर्न इंडिया (प्रकाशित प्रबंध) १९७६

(३०) गरूड शांताराम " कृषि औद्योगिक समाजाचे २५ वर्षे समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी १९८५

(३१) जोशी एस. एम. " मी एस. एम. " कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे १९८४

(३२) जावडेकर श. दा. " आधुनिक भारत " पुणे कॉन्टीनेंटल १९७९

(३३) जाधव भास्कर " सत्यशोधक समाज " कोल्हापूर १९२०

(३४) प्रा. कुरूंदकर नरहर " हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन " संपादक प्रा. द. प. जोशी

(३५) काळे भगवान (संपा) " मराठवाडा काल, आज आणि उद्या " जालना १९८६

(३६) कामथ अे. आर. " ए सेज ऑन सोशल चेंज इन इंडिया " सोमीया मुंबई १९८३

(३७) डॉ. के. के. कावळेकर " नॉन ब्राम्हीण मुव्हमेंट इन साऊथ इंडिया (१८७३–१९४९) शिवाजी विद्यापिठ प्रेस, कोल्हापूर.

(३८) कुलकर्णी ए. जी. " महाराष्ट्रातील राजकीय पक्ष " (१९४७–१९६२)

(३९) कीर धनंजय " महात्मा जोतीराव फुले सामाजिक क्रांतीचे जनक " मुंबई १९६४

(४०) कंटक प्रेमा " सत्याग्रही महाराष्ट्र " सुलभ राष्ट्रीय ग्रंथालय पुणे १९६०

(४१) कुलकर्णी श्री. बा. " संयुक्त महाराष्ट्रच कां? " मुंबई लेखाक १९५१

(४२) काळे बाबुराव " यशवंतराव चव्हाण " मुंबई ना. र. रेगे १९५९

(४३) कुराडे-पवार " शेतकी क्रांतीच्या दिशा " नवसाहित्य प्रकाशन बेळगांव.

(४४) कल्याणकर बा. ह. "संघर्ष " संपादक खा. बाळासाहेब पवार औरंगाबाद ९ ऑक्टोबर १९८३

(४५) कल्याणकर बा. ह. " सुर्यपंखा " प्रकाशक कुलसचिव मराठवाडा विद्यापिठ, औरंगाबाद ३१ मार्च १९८४

(४६) खंडागळे अशोक " भाई माधवराव बागल - एक राजकीय अभ्यास " शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर (अप्रकाशित शोध निबंध)

(४७) लोहिया राममनोहर " भारतमे समाजवाद " हैद्राबाद समता विद्यालय १९७३

(४८) लिमये बंधु " स्वातंत्र्य चळवळीची विचारधारा " बागायतदार स्मृतीमाला पुणे १९८५

(४९) लाड जी. डी. " पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य " भारती विद्यापिठ प्रकाशन पुणे १९८६

(५०) मुन्शी के. एम. " हैद्राबादच्या आठवणी " भारती विद्याभवन मुंबई १९५७

(५१) मेनन व्ही. पी. " द स्टोरी ऑफ इंटीग्रेशन ऑफ इंडियन स्टेटस् " ओरेन्ट दिल्ली १९५६

(५२) मंगुडकर मा. प. " महाराष्ट्राचे राजकारण " पुणे विद्यापिठ पुणे १९६७-६८

(५३) मंगुडकर एस. ती. " परिवर्तनाचे प्रवाह " (१९३२ ते १९६१)

(५४) माने एस. एस. शे.का.प.ची ३१ वर्षाची वाटचाल पुढारी कोल्हापूर ३ ऑगष्ट १९७९

(५५) मोहिते "उत्तमराव" महाविदर्भाचा लोकनेता - पंजाबराव देशमुख " अमरावती.

(५६) म्हात्रे सुरेशचंद्र " शेतकरी संघटना विचार आणि कार्यपध्दती" शेतकरी प्रकाशन अलिबाग

(५७) नलवडे व्ही. एन. " केशवराव जेधे - अ नॉन ब्राम्हण नॅशनॅलिस्ट पोलिटीकल लीडर (अप्रकाशित प्रबंध) शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर.

(५८) फडके य. दी. " केशवरावजेधे " श्री विद्या प्रकाशन पुणे १९८२

(५९) फडके य. दी. " पॉलिटीक्स अँड लँग्वेज " हिमालय प्रकाशन मुंबई १९७९

(६०) फडके य. दी. " महाराष्ट्रातील पक्षोपक्षाचे राजकारण "

(६१) फडके य. दी. " व्यक्ती आणि विचार " श्री विद्या पुणे १९७९

(६२) फडके य. दी. " दिनकर जवळकर समग्र वाड.मय " महात्मा फुले समता प्रतिष्ठान पुणे १९८४

(६३) फडणीस जमन " शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण " अजब प्रकाशन कोल्हापूर ८ फेब्रुवारी १९७८

(६४) फडणीस जगन " सत्तेचे मोहरे महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे राजकारण" ग्रंथाली मुंबई १९७७

(६५) पेंडसे लालजी " महाराष्ट्राचे महामंथन " साहित्य सहकार संघ प्रकाशन मुंबई

(६६) पवार जे. बी. " क्रांतीसिंह नाना पाटील " खंड १ व २ अरुधंती प्रकाशन कोल्हापूर

(६७) परूळकर विजय " योध्दा शेतकरी " राजहंस प्रकाशन पुणे १९८१

(६८) पोवार एस. व्ही. " को-ऑपरेटीव्ह लीडरशीप अँड पॉलिटीक्स ऑफ रुरल महाराष्ट्र ( अप्रकाशित प्रबंध )"

(६९) पटवर्धन वि. अ. " दक्षिण महाराष्ट्रातील संस्थान विलीनीकरणाची कथा पुणे १९६६

(७०) पवार देवीदास " मराठवाडयातील समाजवादी कॉंग्रेस एक अभ्यास" (अप्रकाशित निबंध) शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर.

(७१) पवार टी. जी. " टोबॅको ग्रोअर्स अॅजीटेशन इन निपाणी ए पोलिटिकल स्टडी " (अप्रकाशित निबंध ) शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर.

(७२) पाटील एन. डी. " शेती मालाच्या किफायतशीर किंमतीची कैफीयत " जानेवारी १९७०

(७३) रेड्डी राम अँड शेषाद्री के. स्टडीड ऑफ लिडरशीप इन पोलीटिकल सिस्टीम " ( इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च न्यू दिल्ली १९७९ )

(७४) साळुंखे पी. बी. " महात्मा फुले गौरव ग्रंथ " महाराष्ट्र शासन शिक्षण खाते मुंबई १९८४

(७५) साळुंखे पी. बी. " दे. भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ "
उसमळा प्रकाशन पुणे १९८२

(७६) साळुंखे पी. बी. " श्री शाहु गौरव ग्रंथ "

(७७) सरदार ग. बा. " संक्रमण काळातील आव्हान " ( भारतीय
जीवनातील प्रमुख प्रश्न ) जोशी लोखंडे प्रकाशन पुणे १९६६

(७८) सरदार गं. बा. " महात्मा फुले व्यक्ती आणि विचार "
ग्रंथाली मुंबई १९८२

(७९) शिंदे अे. बी. " माझी कैफीयत " शंकरराव मोरे
शाहु छत्रपती शिक्षण संस्था कोल्हापूर १९७९

(८०) शेषाद्री के. " पोलीटिकल लिंकेज अँड रुरल डेव्हलपमेंट "
न्यू दिल्ली नॅशनल पब्लीशींग हाउस १९७६

(८१) शिरसीकर व्ही. एम. " रुरल इलिट इन अे डेव्हलपींग सोसायटी"
(न्यू दिल्ली ओरियन्ट लॉंगमन्स १९७०)

(८२) सुराणा पन्नालाल " आपला महाराष्ट्र " पुणे समाज
प्रबोधन संस्था १९६०

(८३) शिंदे माधवराव श्रीपती " विजयी मराठाकार श्रीपतराव शिंदे
औरंगाबाद युवराज १९७३

(८४) सत्यनवेशी " संयुक्त महाराष्ट्राचे महाभारत " साधना प्रकाशन
पुणे १९५८

(८५) तापडीया सुरेश " झुंजार सेनानी " संपादक बजाज उद्योग समुह
लातूर

(८६) तीर्थ स्वामी रामानंद " हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी " पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९७६

(८७) ठाकरे केशव (प्रबोधनकार) माझी जीवन यात्रा मुंबई

(८८) ठोके मो. नि. " श्रमिकांचा कैवारी " पारखा प्रकाशन बेळगांव

(८९) ठोके मो. नि. " रा. ना. चव्हाण निवडक वाड.मय " पारखा प्रकाशन मुंबई

(९०) टिळक जयवंतराव (संपादक) ब्राम्हण ब्राम्हणेत्तर वादाचे भवितव्य केशरी संयुक्त महाराष्ट्र विशेषांक जानेवारी १९६०

0९१) वैद्य प्रभाकर " महात्मा फुले आणि त्यांची परंपरा लोकवाड.मय प्रकाशन मुंबई १९८२

संदर्भ वृत्तपत्रे व नियतकालीके यादी

(१) दै. मराठवाडा, औरंगाबाद
(२) दै. लोकमत ,औरंगाबाद
(३) दै. अजिंठा, औरंगाबाद
(४) दै. राजधर्म, लातूर
(५) दै. सकाळ ,पुणे
(६) दै. महाराष्ट्र टाईम्स, मुंबई
(७) दै. केसरी, पुणे
(८) साप्ताहिक माणूस, मुंबई
(९) दै. पुढारी, कोल्हापूर
(१०) लोकप्रभा, मुंबई
(११) युगकर्ता, औरंगाबाद

(१२) अर्ध साप्ताहिक मराठवाडा औरंगाबाद

(१३) इकॉनॉमिक अॅन्ड पोलिटीकल विकली, मुंबई

संदर्भ लेखांची यादी

(१) औटी व्ही. बी. द वर्कींग क्लास मुव्हमेंट इन द नाईनटींथ सेंचुरी " जरनल ऑफ शिवाजी युनिव्हर्सिटी, कोल्हापूर.

(२) औटी व्ही. बी. अॅंड चौसाळकर अे. एस. महात्मा फुले यांच्या विचाराचे स्वरुप, रीड अॅट सेमिनार ऑन-थर्ड महाराष्ट्र पोलिटीकल सायन्स कॉन्फरन्स कोल्हापूर.

(३) चौसाळकर अे. एस. माओत्से तुंग यांचे विचार समाज प्रबोधन पत्रिका नोव्हेंबर, डिसेंबर १९७६ पेज ३४३ ते ३४८